प्रेस नोट

लातूर जिल्हा चालक पोलीस शिपाई भरती-२०२४-२५

दिनांक ०५.०३.२०२६

लातूर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील जाहिराती मध्ये नमुद केल्या प्रमाणे प्रवर्गनिहाय (१६) रिक्त पदांची चालक पोलीस शिपाई भरती २०२४-२५ ची पहिल्या टप्यात "शारिरिक मोजमाप व शारिरिक चाचणी" प्रक्रिया दिनांक १४.०२.२०२६ ते दिनांक २३.०२.२०२६ या कालावधीमध्ये पुर्ण झालेली.आहे.

दुसऱ्या टप्यात लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची **"वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी"** प्रक्रियाकरिता **१:१५ या प्रमाणे एकूण ४९८ उमेदवारांची** दिनांक ०४.०३.२०२६ रोजीपासून सकाळी ०५.०० वा. पासुन पोलीस मुख्यालय, बामळगाव, लातूर येथील मैदानावरती घेण्यात येणार असुन "वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी" करीता त्यांना देण्यात आलेल्या तारखेला उपस्थित राहण्यासाठी उमेदवारांच्या भ्रमणध्वनीवर एस.एम.एस तसेच कॉल करुन व त्यांच्या ई-मेलव्दारे हजर राहणेबाबत समज देण्यात आलेली आहे.

"वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी" ही खालील प्रमाणे द्यावी लागेल. सदर दोन्ही चाचण्यांमध्ये उमेदवारांना एकत्रित किमान ४० टक्के गुण मिळवुन उत्तीर्ण व्हावे लागेल.

अ) हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी — २५ गुण

ब) जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी — २५ गुण

सदर पोलीस भरती २०२४-२०२५ प्रक्रियेमध्ये दिनांक ०५.०३.२०२६ रोजी **(१२०)** उमेदवारांना **" वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी "** करीता बोलाविण्यात आलेले होते. त्यापैकी **(११३)** उमेदवार सदर भरती प्रक्रियेस उपस्थित राहिले असुन **(०७)** उमेदवार हे दिनांक ०५.०३.२०२६ रोजीच्या पोलीस भरती प्रक्रियेस गैरहजर राहिले आहेत.

पोलीस भरती प्रक्रियेस हजर असलेल्या दिनांक ०५.०३.२०२६ रोजी (१२०) उमेदवारांना "वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी" करीता बोलाविण्यात आले होते, "वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी" करीता हजर आलेल्या (११३) उमेदवारांची चाचणी घेण्यात आली असता (१०२) उमेदवार हे सदर चाचणीमध्ये पात्र झाले असुन, (११) उमेदवार अपात्र झाले आहेत. सदर कौशल्य चाचणीमध्ये उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी या कार्यालयाचे संकेतस्थळ **www.laturpolice.gov.in** वरती व पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथील दर्शनी भागावरील टिकाणी डकविण्यात आलेली आहे.

सदर प्रमाणे प्रसिद्ध करण्यात आलेल्या गुणांचे यादीबाबत उमेदवारांचा काही आक्षेप असल्यास त्यांनी (४८) तासामध्ये लेखी आक्षेप या कार्यालयाचे ई-मेल आयडी **sp.latur@mahapolice.gov.in** यावरती नोंदविण्यात यावा यानंतर प्राप्त होणारे आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ०६.०३.२०२६ रोजी सकाळी ०५.०० वा. बोलविण्यात आलेल्या उमेदवारांना "वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी" करीता पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर येथे हजर राहणे बाबत त्यांचे भ्रमणध्वनीवर, एस.एम.एस. व ई-मेलद्वारे माहिती देण्यात आलेली असून नमुद उमेदवारांनी सकाळी ०८.०० वा.पर्यंत पोलीस मुख्यालय, बाभळगांव लातुर येथील मैदानावरती हजेरी लावणे अनिवार्य आहे.

तसेच नमुद उमेदवारांनी "वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी" करीता पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर या टिकाणी **शारिरीक मोजमाप व शारिरीक मैदानी चाचणी करीता देण्यात आलेले ऑनलाईन प्रवेशपत्र (Hall Ticket), ड्रायव्हिंग लायसन्स, आधारकार्ड व (४) पासपोर्ट साईज फोटो सह उपस्थित रहावे. उमेदवार दिलेल्या तारखेस सदर चाचणीकरीता उपस्थित न राहिल्यास त्यांना पुन्हा संधी देण्यात येणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी.**

लातूर जिल्हा चालक पोलीस शिपाई संपूर्ण भरती प्रक्रिया ही सी.सी.टि.व्हि. व व्हिडीओ ग्रॉफी च्या निघराणीखाली अतिशय तटस्थपणे, नि:पक्षपातीपणे व पारदर्शकरित्या घेण्यात येत असून उमेदवारांने कोणत्याही आमिषास व भुलथापांना बळी पडु नये, कोणाकडुन असे करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची बाब पोलीस अधीक्षक, लातूर, अपर पोलीस अधीक्षक, लातूर, पोलीस उप अधीक्षक (मुख्या.), लातूर व पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांना तात्काळ कळविण्यात यावी असे लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत आव्हान करण्यात येत आहे.

टिप:- वाहन कौशल्य चाचणीकरिता प्रत्येक टप्यावर पात्र उमेदवारांस उपस्थित रहाणे अनिवार्य आहे. म्हणुन सदर भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवारांनी त्यांची कौशल्य चाचणी पुर्ण होई पर्यंत त्यांनी पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर येथे हजर रहावे लागेल या पुर्व तयारीनिशी यावे लागेल.

अमोल श्री तांबे (भापोसे)
पोलीस अधीक्षक, लातूर